महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/सा.आ.११७/न.क्र.५६९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. १२६ दिनांक ०६.१०.२००७

विषय : म.रा.विद्युत् वितरण कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना ०१ जुलै, २००७ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

वाचा : स.सा.आ.क्र.११७ (क) दिनांक ३१.३.१९८६
प्रशासकीय परिपत्रक क्र.१०१ दि.१८.०४.२००७

...........

महाराष्ट्र शासनाने वेळेवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे तत्कालीन म.रा.वि.मंडळाच्या पुनर्रचित महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता शासन निर्णय वित्त विभाग क्र.मभवा-११०७/प्र.क्र.१२/सेवा-९ दि.२४ सप्टेंबर २००७ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना दि.०१.०७.२००७ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ६ टक्के वाढीव दराने म्हणजे ३५ % ऐवजी ४१ % अशा सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला आहे.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.विद्युत् वितरण कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना ८५ % ऐवजी ९१ % अशा सुधारित दराने दि.०१.०७.२००७ पासून महागाई भत्ता देण्याबाबत संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन व्यवस्थापकीय संचालक म.रा.विद्युत वितरण कं.मर्या.यांनी मंजुरी दिली आहे.

४. परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केलेल्या सुधारित दरानुसार महागाई भत्त्याची रक्कम महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना माहे आक्टोबर २००७ पासूनच्या वेतनामध्ये समाविष्ट करुन देण्यात यावी.

५. सदर सुधारित दराने द्यावयाच्या महागाई भत्त्याची दि.०१.०७.२००७ ते ३०.०९.२००७ पर्यंतच्या तीन महिन्यांच्या थकबाकीची रक्कम माहे आक्टोबर २००७ च्या वेतनासोबत अदा करण्यात यावी.

६. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंबंधात विद्यमान तरतुदी व कार्यपध्दती आहे तशाच यापुढेही लागू राहतील.

७. संबंधित अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी महागाई भत्त्याची वाढीव रक्कम प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी, व्यवस्थापक ( वित्त व लेखा - अर्थोपाय विभाग ), हाँगकाँग बँक बिल्डिंग, ४ था मजला, मुंबई - ४०० ०२३ यांचेकडे संपर्क साधावा.

८. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि. वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु. य. पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
म.रा.विद्युत वितरण कं.मर्या.च्या प्रेषण यादीप्रमाणे.

*D.A.Circular-July 2007*